**नियोजन विभागास वित्तीय अधिकार**
**प्रदान करण्याबाबत**
**वित्तीय अधिकार नियम पुस्तिका**
**१९७८ (भाग-२)**

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग(रोहयो)
शासन निर्णय क्रमांक:सुप्रमा - २०१२/प्र.क्र.२५९/रोहयो-८
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक: १२ फेब्रुवारी, २०१४.

पहा :- १) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक. पीटीएस-१४८५/सीआर-४८/आरएलजी-३, दिनांक १४ मार्च, १९८६
२) शासन निर्णय, नियोजन विभाग क्रमांक.सुप्रमा — २०१२/प्र.क्र.२५९/रोहयो-८ दिनांक १८ फेब्रुवारी २०१३

**प्रस्तावना :-**

रोजगार हमी योजना तसेच ग्रामीण भूमीहिन रोजगार हमी कार्यक्रमाखाली घेण्यात येत असलेल्या कामांच्या बाबतीत सुधारित प्रशासकीय मान्यता देण्याबाबतचे अधिकार व सक्षम अधिकारी दि.१४ मार्च,१९८६ च्या शासन निर्णयानुसार विहीत केले होते. तसेच प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान समितीने केलेल्या शिफारशीनुसार संबंधित प्रशासकीय विभाग म्हणून नियोजन विभागाला संदर्भिय शासन निर्णय दि. १३ एप्रिल १९९९ व १८ फेब्रुवारी २०१३ च्या सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्याप्रमाणे व त्यात दर्शविलेल्या विहीत अटी आणि शर्तीच्या, तसेच विहीत वित्तीय मर्यादेच्या अधीन राहून वित्तीय अधिकार प्रदान करण्यास मंजूरी व सदर वित्तीय शक्तीचा वापर करण्याबाबतही सुचना दिल्या होत्या. जुन्या रोजगार हमी योजनेतील अपूर्ण कामांना साधारणत: १० ते १५ वर्षापूर्वी प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या आहेत. दरम्यानच्या काळात मजुरांच्या मजुरीच्या दरात, जिल्हा दरसुची, गौणखनिजाच्या दरात व इतर बाबीमध्ये वाढ झालेली आहे. या बाबी विचारात घेता तसेच जुन्या रोजगार हमी योजनेतील शासन मान्य यादीतील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी सदर वित्तीय शक्तीत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

जून्या रोजगार हमी योजनेंतर्गत अपुर्ण असलेल्या कामांच्या बाबतीत सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याच्या अधिकारात सोबत जोडलेल्या परिशिष्टानुसार वाढ करण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर अधिकारांचा वापर करण्यास सक्षम असणाऱ्या अधिकाऱ्यांनी विहीत केलेल्या मर्यादेपर्यंत व विहीत अटीच्या अधीन राहून सुधारीत प्रशासकीय मंजूरी द्यावी. (त्यामध्ये वाढीव खर्च प्रती अंदाजपत्रक याचा अर्थ सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येणाऱ्या कामासाठी सध्या होणारा प्रत्यक्ष खर्च असा आहे.) सोबत जोडलेल्या परिशिष्टामधील मर्यादेबाह्य खर्च अपेक्षित असल्यास अथवा विहीत अटी किंवा त्यातील एखादी अट पूर्ण होत नसेल तर अशा प्रस्तावास वित्त विभागाची वित्तीय अथवा प्रशासकीय मंजूरी आवश्यक राहील.

३. या वित्तीय अधिकारांचा वापर करुन मंजुरी प्रदान करतांना ज्या प्रकरणी विशिष्ट मानके (स्टॅन्डर्ड) अथवा विशिष्ट सुत्र विहित केलेले असेल, अशा प्रकरणी विहीत मानकांचे / सुत्रांचे अनुकरण करण्यात यावे.

४. प्रदत्त शक्तीचा वापर करुन दिल्या जाणाऱ्या मंजुरीबाबतचा प्रत्येक आदेश संबंधित सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने निर्गमित करावा. संबंधित सक्षम अधिकाऱ्याच्या मान्यतेने आदेश निर्गमित केले आहेत, असा स्पष्ट उल्लेख प्रत्येक मंजुरी आदेशात करण्यांत यावा.

५. या वित्तीय अधिकारांचा वापर करुन मंजुरी आदेश निर्गमित करतांना सक्षम प्राधिकाऱ्याने सदर मंजुरी आदेशाची प्रत इतर सर्व संबंधित अधिकाऱ्याप्रमाणेच संबंधित लेखा परिक्षा अधिकाऱ्याला व वित्त विभागाला (कार्यासन विनियम व संबंधित व्यय कार्यासन) पाठवावी व अशा मंजुरी आदेशामध्ये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-२ मधील संबंधित वित्तीय शक्तींचा अनुक्रमांक/शासन निर्णयाचा क्रमांक, दिनांक व त्यासोबतच्या परिशिष्टांतील वित्तीय शक्तींचा अनुक्रमांक यांचा न चुकता स्पष्ट उल्लेख करावा.

६.	या शासन निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टातील वित्तीय शक्ती वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-२ द्वारा प्रदान करण्यांत आलेल्या वित्तीय शक्तींचा एक भाग म्हणून समजण्यात यावा. ज्यावेळी भाग-२ चे प्रकाशन छापले जाईल त्यावेळी त्यांत या शक्तींचा अंतर्भाव करण्यात यावा.

७.	जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील अपूर्ण कामातील बराचसा अकुशल भाग पूर्ण झालेला आहे व काही अकुशल भाग शिल्लक राहिलेला आहे. त्यामुळे उर्वरित अकुशल भागही निविदेद्वारे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. यामध्ये काही मजूरांची आवश्यकता भासल्यास त्या मजूरांना शासनाच्या धोरणानुसार मजूरी (रु. १६२/-) देण्यात यावी.

८.	जुन्या रोहयोतील शासनमान्य यादींतील अपुर्ण कामापैकी पुर्ण झालेली कामे व शिल्लक राहिलेली कामे यांचा अहवाल प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत शासनास सादर करावा.

९.	**सदर आदेश दि. ३० जून २०१४ पर्यंतच अंमलात राहिल.**

१०.	हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या मान्यतेने त्या विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५२८/२०१३/व्यय-८, दि. ५.१२.२०१३ व ७१८/२०१३/विनियम, दिनांक १६.१२.२०१३ अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे.

११.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र. २०१४०२१२१२२२१६८३१६ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने

12/2/2014

(आर. विमला)
उप सचिव (रोहयो) नियोजन विभाग

सहपत्र- परिशीष्ट

प्रत,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई ४०००२६
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
मा.उपमुख्य मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता)१/२, मुंबई, नागपूर
महालेखापाल, महाराष्ट्र राज्य (लेखा परिक्षा)१/२, मुंबई/नागपूर,
लेखा व अधिदान अधिकारी , मुंबई,
वित्त विभाग (विनीमय) (अर्थसंकल्प) व (व्यय ८), मंत्रालय, मुंबई
मा.मंत्री (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
मा.राज्यमंत्री (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक
मुख्य सचिवांचे स्वीय सहाय्यक,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (रोहयो) यांचे स्वीय सहाय्यक,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी (मुंबई व मुंबई उपनगर वगळून),
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.
सर्व उपायुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय
सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग,
मूख्य अभियंता (स्था.स्तर) पुणे
सर्व मुख्य अभियंता (सा.बां.वि.)
सर्व अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग
सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व उपजिल्हाधिकरी (रोहयो)
उप सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ, रोहयो समिती, महाराष्ट्र विधानमंडळ, विधानभवन, मुंबई
संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.(प्रसिध्दीकरिता)
कृषि आयुक्त, पुणे,
संचालक, मृदसंधारण व्यवस्थापन, पुणे,
संचालक, फलोत्पादन, पुणे,
सर्व विशेष कार्याधिकारी व पदसिध्द उप विकास आयुक्त, (रोहयो विभागातील आयुक्त कार्यालय),
मुख्य अभियंता व सह सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग,मंत्रालय, मुंबई,
मुख्य अभियंता व सह सचिव, जलसंपदा विभाग,मंत्रालय, मुंबई,
सर्व जिल्हा अधीक्षक, कृषि अधिकारी,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, नियोजन विभाग (रोहयो),
संचालक, सामाजिक वनीकरण,पुणे,
सारसंग्रह रोहयो-१/निवडनस्ती, रोहयो-८.

**शासन निर्णय क्रमांक सुप्रमा-२०१२/प्र.क्र.२५९/रोहयो-८ दिनांक :- १२ फेबुवारी,२०१४ चे परिशिष्ट**

**वित्तीय अधिकार नियम पुस्तिका १९७८ भाग-२**

**नियोजन विभागाला महाराष्ट्र अर्थ संकल्प नियम पुस्तिका १९७७ व रोजगार हमी योजनाअंतर्गत नियमा खालील प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार.**

सुधारित अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यतेसंदर्भात सुधारणा (शासन निर्णय नियोजन विभाग क्र.पीटीएस – १४८५/सीआर-४८/आरएलजी-२, दि.१४ मार्च,१९८६ व शासन निर्णय क्र.सुप्रमा-२०१२/प्र.क्र. २५९/रोहयो-८, दि.१८ फेब्रुवारी, २०१३ च्या अनुषंगाने)

| अ. क्र. | वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८ मधील अनुक्रमांक | वित्तीय अधिकार नियम पुस्तीका १९७८ मधील नियम क्र. | वित्तीय शक्तीचे वर्णन | अधिकाराचा वापर करण्यास सक्षम अधिकारी | प्रचलित मर्यादा (शा.नि. नि.वि. दि.१४.३.१९८६ व १८ फेब्रुवारी,२०१३ नुसार) | या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आलेली मर्यादा | अटी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ६ | महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम क्र.२७ (२) व रोहयो | रोजगार हमी योजनेअंतर्गत अपूर्ण कामाच्या सुधारित वाढीव अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणे. | अ)जिल्हाधिकारी<br>---<br>ब)विभागीय आयुक्त<br>---<br>क) शासन | रु.३० लक्ष पर्यंत<br>---<br>रु.४५ लक्ष पर्यंत<br>---<br>अ)रु.४५ लक्षच्या पुढे ब)सुधारित अंदाजपत्रक मूळ अंदाजपत्रकापेक्षा रु. १५.०० लक्ष किंवा १५ टक्के पेक्षा जास्त होत असेल त्यावेळी अशा वाढीव खर्चास व्यय अग्रक्रम समितीची मान्यता घेण्यात यावी. | रु.७५ लक्ष पर्यंत; वाढीव खर्च प्रति अंदाजपत्रक रु.१०.०० लक्ष पर्यंत मर्यादीत असावा.<br>---<br>रु. १ कोटी पर्यंत; वाढीव खर्च प्रति अंदाजपत्रक रु.२०.०० लक्ष पर्यंत मर्यादीत असावा.<br>---<br>रु. १ कोटीच्या पुढे वित्त विभागाच्या सहमतीने. | (१)अर्थसंकल्पिय तरतूद असली पाहिजे.<br>(२) वि.वि.क्र.बीजीटी-२२८१/२६,बीयुडी,दि.१९/११/१९८१च्या शासन निर्णयातील तरतुदीचे अनुपालन करण्यात यावे.<br>(३) सर्व प्रचलित नियम, आदेश व कार्यपध्दतीचे अनुपालन करण्यात यावे.<br>(४) हे अधिकार पुन:प्रदान करता येणार नाहीत.<br>(५)जुन्या रोजगार हमी योजनेतील शासनमान्य यादीतील अपूर्ण कामे पूर्ण करण्याकरीता दि. ३०.०६.२०१४ पर्यंतच सदर अधिकार प्रदत्त करण्यात येत आहेत. |